# ओपन ॲक्सेस बाबत

- ओपन ॲक्सेससाठी पनवानग्या देण्याबाबतीतील महावितरणची विशेष रजा याचिका (SLP) मे. सर्वोच्च न्यायालयासमोर दि. २३ मे २०११ रोजी सुनावणीसाठी घेण्यात आली.

- ओपन ॲक्सेसशी सबंधित सर्व बाबींचे निराकरण प्रलंबित असताना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मोठ्या प्रमाणावर ओपन ॲक्सेससाठी परवानग्या दिल्या तर महावितरणने मुंबई उच्च न्यायालयासमोर आपले म्हणणे मांडावे असे मत मे. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले.

- **मे. सर्वोच्च न्यायालयाने असेही मत व्यक्त केले की, महावितरण अशा ओपन ॲक्सेस ग्राहकांना स्टँडबाय वीजपुरवठा करण्यास बांधील राहणार नाही.**

- हे लक्षात घेता **अशी अपेक्षा आहे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ओपन ॲक्सेसशी सबंधित सर्व बाबी आणि विद्युत अधिनियम २००३ च्या बंधनकारक तरतुदी लक्षात घेतल्याशिवाय ओपन ॲक्ससाठी कुणालाही परवानगी देणार नाही.** यासाठी महावितरण आपल्या स्तरावर मागील एक वर्षापेक्षा अधिक काळापासून आयोगाला सातत्याने विनंती करीत आहे.

- ओपन ॲक्सेस या विषयाची व्यापकता आणि त्याचे महाराष्ट्राच्या वीज ग्राहकांवर होणारे परिणाम या विषयी मे. सर्वोच्च न्यायालयाला अवगत करण्यात आले. त्यावर **हा विषय अत्यंत महत्त्वाचा असून मुंबई उच्च न्यायालयाने याबाबतीतील महावितरणची याचिका तातडीने सुनावणीसाठी घ्यावी, असे सकृतदर्शनी मत मे. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे.** मे. सर्वोच्च न्यायालयाने असेही मत व्यक्त केले आहे की, महावितरणने गुणवत्तेच्या आधारावर या संपूर्ण प्रकरणी आपली बाजू मुंबई उच्च न्यायालयासमोर मांडावी.

- **ओपन ॲक्सेस आणि क्रॉस सबसिडी अधिभार यांचा वितरण हानीशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही,** याचा पुनरुच्चार महावितरण करीत आहे. **काहीही असले तरी महावितरणने वितरण हानी कमी करण्याच्या बाबतीतील उद्दिष्टे गाठलेली आहेत. २०१०-११ ची अंदाजित ( Provisional) वितरण हानी १७.३१ टक्के आहे. (आयोगाने १७.२ टक्क्यांचे लक्ष्य निर्धारित केले होते.)**

- ओपन ॲक्सेस घेणाऱ्या मोठ्या ग्राहकांनी कायद्याने देय असलेला क्रॉस सबसिडी अधिभार न देता ओपन ॲक्सेस घेतला तर त्याचा भूर्दंड वीजदरवाढीच्या माध्यमातून सामान्य वीज ग्राहकांवर पडेल. तो तसा पडू नये म्हणूनच महावितरण आयोग, मे. उच्च न्यायालय आणि मे. सर्वोच्च न्यायालय यांच्यासमोर सातत्याने बाजू मांडित आहे.

*****